# " आक्रीत "

आत्ता आत्ता कुठे थोडसं
मोकळं झाल्यासारखं वाटलं
कोरोना हद्दपार झाला म्हणून
आभाळ ठेंगणं झालं !! --------

रोजची कामे होत होती
स्वावलंबनाने घरातल्या घरातच
बऱ्याच महिन्यांनी खुल्या जगात
पाऊल टाकलं दबकत दबकतच !! ------

सुरु झालं शॉपिंग, मार्केटिंग, गेट टू गेदर
नियमांचं पालन करून
खरचं, खूप खूप समाधान वाटलं
शक्य असलं त्यांना प्रत्यक्ष भेटून !! ------

शाळा, कॉलेज, ऑफीस, लायब्ररी
झाली अंशकालीन सुरु
हळूहळू मनाची खात्री पटू लागली
सर्व कांही पून्हा सगळं सुरळीत करु !! -----

पण कसचं काय न् कसचं काय ??
दक्षिण ऑफ्रिकेतून आला ओमिक्रॉन व्हायरस
हा तर त्या कोरोनापेक्षाही महाभयंकर
शोषून घेतो म्हणे जीवनरस !! ------

आपत्तीमुळे या झाली सगळ्यांची दैना
कसे कंठावे जीवन, सारेच झाले विस्कळीत
स्वस्थ जगण्याचा उपाय मात्र सापडेना
सारे कांही गिळंकृत करण्यास उभे ठाकते हे आक्रीत !! ----

वागून जबाबदारीने
देवूया साथ कोरोना योध्यांची
करु यावरही मात
जिंकू लढाई जीवनाची !! ---

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.